पोलीस अधीक्षक कार्यालय,जळगाव
फोन ०२५७-२२२१७९० फॅक्स ०२५७-२२२०५११
Email ID:-sp.jalgaon@mahapolice.gov.in

-: प्रेसनोट :- जनसंपर्क अधिकारी
दि.१६/०७/२०२६

## "स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई :- जबरी चोरी करुन लुटलेला मोबाईल हस्तगत, दोन आरोपी जेरबंद"

जळगाव शहर पोलीस ठाण्यात गु.र.नं.१०१/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ३०९(४), १२६(२), ३(५) अन्वये जबरी चोरीचा गुन्हा दाखल होता. या गुन्ह्याचा समांतररित्या तपास स्थानिक गुन्हे शाखा जळगांव करीत होती.

दि.१६ एप्रिल २०२६ रोजी रात्री सुमारे १०.३० वाजण्याच्या सुमारास फिर्यादी मुस्तकीन शेख सईद, रा. उस्मानिया पार्क, जळगाव हे मोटार सायकल वरून जिल्हा परिषद कार्यालयासमोरील रस्त्याने जात असताना दोन अज्ञात इसमांनी त्यांना अडवून पैशांची मागणी केली. फिर्यादीकडे पैसे नसल्याने आरोपींनी त्यांच्याकडील ६०००/- रु.कि.चा Vivo कंपनीचा मोबाईल जबरदस्तीने हिसकावून नेला. याप्रकरणी जळगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक संदीप गावीत आणि उपविभागीय पोलीस अधिकारी नितीन गणापुरे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तपास सुरू केला. गोपनीय माहितीच्या आधारे रेकॉर्डवरील गुन्हेगार अक्षय मुकेश अटवाळ यास ताब्यात घेण्यात आले. चौकशी दरम्यान त्याने साथीदार चंद्रकांत रमेश दिवेकर याच्यासह हा गुन्हा केल्याची कबुली दिली.

त्यानंतर दोन्ही आरोपींना अटक करून त्यांच्या ताब्यातून चोरीस गेलेला ६०००/- रु.कि.चा Vivo कंपनीचा मोबाईल हस्तगत करण्यात आला. आरोपी अक्षय मुकेश अटवाळ याच्याविरुद्ध यापूर्वी जबरी चोरी व चोरीचे चार गुन्हे दाखल असल्याचे तपासात निष्पन्न झाले.

सदर कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल गायकवाड, पोलीस उपनिरीक्षक दीपक जगदाळे, सहाफौ.अतुल वंजारी, पोहेकॉ.अकरम शेख, पोहेकॉ.विजय पाटील, पोहेकॉ.मुरलीधर धनगर, पोहेकॉ.प्रविण भालेराव, पोहेकॉ.किशोर पाटील, पोकॉ.रविंद्र कापडणे, पोकॉ.छगन तायडे, पोकॉ.प्रदिप सपकाळे, पोकॉ.राहुल रगडे या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने यांचे पथकाने उत्कृष्ट व उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

अटक आरोपींना पुढील कायदेशीर कारवाईसाठी जळगाव शहर पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले असून, पुढील तपास पोहेकॉ. दीपक शिरसाट करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक, कार्यालय,जळगांव.

प्रति,

सर्व संपादक / वार्ताहार
प्रिंट मिडीया/इलेक्ट्रॉनिक मिडीया,
2/- जनहितार्थ प्रसारण करीता.

